(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. IX / Issue – II ISSN 2277-8063

# स्त्रीवादी चळवळ: समता प्रस्थापित करण्यात मोलाची भूमिका

**डॉ.संदिप बी.नेरकर,**

राज्यशास्त्र विभाग, प्रताप महाविद्यालय, अमलनेर, जि.जळगांव sbnpca@gmail.com

**प्रस्तावना :**

जगातील एकूण लोकसंख्येच्या निम्मे असलेल्या महिलांना आपले हक्क व अधिकार आणि स्वातंत्र्य पुरूषांप्रमाणे व बरोबरीने मिळाले नाही. त्यांना त्यासाठी मोठा संघर्ष करावा लागला. पूर्वापार मानल्या गेलेल्या विकसित समाजात देखिल परिस्थिती फारशी वेगळी नव्हती व युरोपासकट सर्वच देशांमध्ये महिलांना अत्यंत हीन, दुय्यम वागणूक दिली जात होती. त्या विरोधात सर्वच देशांमध्ये महिलांना अधिकार प्राप्त करून देण्यासाठी विविध चळवळी निर्माण झाल्या व या स्त्रीवादी चळवळींनी केलेली आंदोलने. मग अमेरिकेत १९१३ मधील मताधिकारासाठीचे आंदोलन असेल, कामाच्या ठिकाणी होणाऱ्या शोषणाविरोधातील आंदोलन असेल तर अगदी भारतातील २०१९ मधील केरळमधील शबरीमाला मंदिरात प्रवेशासंदर्भातील आंदोलनापर्यंत या सर्वांची फार महत्वाची भूमिका स्त्रीयांना अधिकार मिळवून देण्यामध्ये, स्त्रीयांच्या स्वातंत्र्यासंदर्भातून तर स्त्री–पुरूष समता प्रस्थापित करून महिलांची स्वतंत्र अस्मिता निर्माण करण्यापर्यंत महत्वाची भूमिका राहिलेली आहे.

जगातील प्रत्येक देशांमध्ये स्त्रियांच्या विकासासाठी, अधिकारांसाठी, स्वातंत्र्यासाठी सामाजिक, आर्थिक, राजकीय व मानसिक परिस्थिती प्रतिकुल आहे. स्त्रियांना जुन्या चालीरिती रूढी, प्रथा परंपरांनी वेढले आहे. पुरूष सत्ताक समाजात स्त्रियांना मिळालेल्या दुय्यमतेचा विरोध करणे. सामाजिक, राजकीय व आर्थिक सत्ता स्थानात पुरूषांच्या बरोबरीने स्थान प्राप्त करून देणे व स्त्री–पुरूषांमध्ये खरीखुरी समता प्रस्थापित करणे हे या स्त्रीवादी चळवळीचे स्वरूप आहे. पुरूषसत्ताक समाजव्यवस्थेचे स्त्रीला कधी देवता म्हणून पुजले तर कधी भोगवस्तू म्हणून तिच्याकडे पाहिले तर कधी शोभेची बाहूली म्हणून पाहिले. मात्र तिचे माणूसपण नाकारले. स्त्रीची ही प्रतिमा पुसुन टाकणे हे स्त्रीवादी चळवळीचे महत्वपूर्ण काम आहे. पुरूषाला समाजात जसे एक अर्थपूर्ण स्थान आहे तसेच समान अर्थपूर्ण स्थान स्त्रीलाही प्राप्त व्हावे. यासाठी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात संघर्ष करणारी 'स्त्रीवादी' चळवळ आहे.

स्त्रीवादी चळवळीने स्त्री तत्वज्ञान मांडले. समाजात, कुटुंबात, कामाच्या ठिकाणी होणाऱ्या शोषणाची दडपवणूकीची जाणीव करून देणे व ही परिस्थिती बदलून स्त्री–पुरूष समता प्रस्थापित करण्यासाठी स्त्रिया आणि पुरूष यांना जाणीवपूर्वक कृती करण्यास भाग पाडणारी चळवळ आहे. ''मुक्त झाल्याशिवाय माणूस व्यक्त होवू शकत नाही आणि व्यक्त झाल्याशिवाय तो 'असू' शकत नाही. या असण्याच्या ध्यासातून स्त्रीलाही तिच्या अस्तित्वाची जाणीव होते.'' स्त्रीवादी चळवळ ही तत्वप्रणाली व सिद्धांत शोषणाधारित व्यवस्थेकडून मुक्तीचा प्रवास करते. स्त्री मुक्तीचा लढा हा एकाच वेळी स्त्री वर्गाच्या मुक्तीचाही लढा आहे व स्त्री–पुरूष समतेचा तसेच स्त्री वर्गांतर्गत स्त्री समतेचाही लढा आहे आणि सर्वंकष समतेसाठी ही हा लढा आहे. असे व्यापक स्वरूप स्त्रीवादीला आहे.

उदारमतवादाने प्रत्येक व्यक्ती ही विचारक्षम आणि विवेकशील आहे (Every Human being is a Rational)- अशी भूमिका मांडली आणि त्यामुळे आपल्या बुद्धीच्या सहाय्याने त्याला बरे–वाईट कळते. स्वहित वा अहित कळते. काय स्विकारायचे काय, नाकारायचे हे कळते म्हणून त्यांना स्वातंत्र्य व व्यक्ती प्रतिष्ठा जोपासली जाते. प्रत्येक व्यक्ती विचारक्षम, विवेकशील वा विवेकी आहे. याचा अर्थ स्त्री व पुरूष दोघेही विचारक्षम, विवेकशील व विवेकी आहेत. जसे पुरूषांना कळते तसेच स्त्रियांनाही कळते. म्हणून जे अधिकार व स्वातंत्र्य पुरूषांना आहे ते स्त्रीलाही हवे.

**जागतिक पातळीवर महिला हिंत संदर्भातील महत्वपूर्ण घटनाक्रम :—**

१७९२ ला ब्रिटन मध्ये मेरी वोल्स्टन क्राप्टने महिला अधिकारांवर 'अ विंडीकेशन ऑफ दि राईट्स ऑफ वुमन' पुस्तक लिहिले. १८५७ मध्ये न्युयॉर्क शहरामध्ये ८ मार्च ला महिलांनी शोषणाविरोधात आंदोलन केले. १८६९ मध्ये जे.एस.मील व पत्नी हॅरीएट टेलर ने 'दि सब्जेक्शन ऑफ वूमन' हे पुस्तक लिहिले. १८९३ मध्ये सर्वप्रथम न्युजीलॅंडमध्ये महिलांना मताधिकार मिळाला. त्यानंतर १९०१ मध्ये ऑस्ट्रेलियात १९१३ मध्ये नॉर्वे, १९१६ मध्ये कॅनडा, १९१८ मध्ये ब्रिटन, १९२० मध्ये अमेरिका, १९४५ मध्ये इटली इ. देशांनी स्त्रियांना मताधिकार दिला.

१९४६ मध्ये संयक्त राष्ट्र संघाने Status of Women या नावाने एक कमिशन स्थापन केले. १० डिसेंबर १९४८ रोजी मानवाधिकारांचा जाहिरनामा घोषित केला. त्यात महिलांना समान अधिकाराचा उल्लेख केला. १९५२ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या महासभेत महिलांना राजकीय अधिकारांसंदर्भात नियम पारित केला. १९५९ मध्ये श्रीलंकेत एस.भंडारनायके या विश्वात पहिल्या महिला पंतप्रधान निवडून आल्या. १९५७ मध्ये संयुक्त राष्ट्र संघ द्वारा आंतरराष्ट्रीय महिला संमेलन आयोजित केले गेले व पहिले जागतिक महिला संमेलन जुलै १९७५ मध्ये मेक्सिकोमध्ये आयोजित केले गेले. १९७५ संयुक्त राष्ट्र संघाने 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' घोषित केले. तर १९७५—८५ हे दशक संयुक्त राष्ट्र संघाने आंतरराष्ट्रीय महिला दशक घोषित केले. दुसरे जागतिक महिला संमेलन जुलै १९८० मध्ये कोपेन हेगन ला तर तिसरे जुलै १९८५ मध्ये नैरोबी मध्ये भरावले गेले. चौथे १९९५ मध्ये पेइचिंग (चीन) मध्ये मध्ये भरले. २००५ मध्ये बांग्लादेशमध्ये संसदेत १५ टक्के आरक्षण महिलांना दिले गेले. २००५ मध्ये एंजेला मर्केल जर्मनीत पहिली महिला चान्सलर बनली. २००५ मध्ये लाइबेरियात ऐलन जॉन्सन सरलीफ अफ्रिकी देशांमध्ये राष्ट्रपती पदावर पहिली महिला झाली. २००६ मध्ये बहरीन मध्ये जासेम अल कावरी खाडी देशांमध्ये पहिली महिला न्यायाधिश नियुक्त झाली. १० डिसेंबर २०१९ पासून सना मरीन फिनलॅंड मध्ये पंतप्रधान म्हणून निवडून आली.

वरील प्रकारचा घटनाक्रम लक्षात होता. स्त्रीवादी चळवळीच्या प्रभावामुळे निरनिराळया देशांमध्ये महिलांच्या संदर्भात काही आंदोलने झाली व काही सकारात्मक पाऊल उचलले गेले त्यामुळे स्त्री—पुरूष समता प्रस्थापित होण्यामध्ये महत्वपूर्ण पाऊल ठरले. ''ज्याप्रमाणे सिमॉ दि बोवूवा म्हणतात की, 'स्त्री जन्माला येत नाही, तर ती घडवली जाते. स्त्रीत्वाच्या या सामाजिक जडण—घडणीत स्त्रीच्या शोषणाची बीजे अंकुरित होतात व पुढे ती शोषण वेल पुरूषात्मक व्यवस्था काळजीपूर्वक जोपासते.''[१]

**भारतातील घडामोडी वा ऐतिहासिक विकास :—**

भारतात ब्रिटिशांमुळे पश्चिमी उदारमतवादाशी ओळख झाली. त्यांनीच आधुनिक शिक्षणाचा पाया घातला व सर्व जाती, धर्मातील लोकांना शिक्षण खुले केले. धर्माने व परंपरेने जखडलेल्या स्त्रीला स्वतंत्र करण्यासाठी धर्मचिकित्सा व धार्मिक सुधारणेचे युग अवतरले. ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज, रामकृष्ण मिशन, सार्वजनिक सत्यधर्म या नवधर्म संप्रदायांनी पारंपारिक समाजातील स्त्रीच्या दुरावस्थेकडे सर्वांचे लक्ष वेधले. धर्म सुधारणा शिवाय स्त्रीची दुरावस्था दूर होणार नाही. हे जाणून धार्मिक व सामाजिक रूढींच्या विरोधात आवाज उठविला. सतीची प्रथा, बालविवाह, विधवाविवाह बंदी, केशवापन इ. विरोधात राजाराम मोहन रॉय, ईश्वरचंद, विद्यासागर, गोपाल हरी देशमुख, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, न्यायमूर्ती रानडे, गो.ग.आगरकर इ.नी. स्त्रीशिक्षण व स्त्री पुरूष समानता या तत्वांचा जोरदार प्रसार केला.

- १८२९ — सती बंदीचा कायदा
- १८५६ — विधवा पुनर्विवाह विधेयक मंजूर
- १८६० — संमती वयाची विवाहाची मर्यादा १०
- १९०८ — पुण्याजवळ धोंडो केशव कर्वे यांनी हिंगण्याला विधवांसाठी वसतिगृह

- १८८९ — पंडिता रमाबाई मुंबईत शारदा सदर सुरू केले
- १८८९ — महात्मा फुलेंनी भ्रुणहत्या होवू नये म्हणून अविवाहित बायका व विधवा यांच्यासाठी आधारगृह सुरू केले.

**फुले—आगरकर — स्त्री चिंतन :—**

१. स्त्रीला के वळ मादी स्वरूप मानले आहे त्यातून सुटका करून तिचे मनुष्यत्व स्विकारले पाहिजे.
२. एक सार्वभौम विचारक्षम व्यक्ती म्हणून स्त्रीला मान्यता मिळाली पाहिजे.
३. नागरी व सार्वजनिक जीवनात स्त्रीला निर्भयपणे सहभागी होता आले पाहिजे.
४. पुरूषी वर्चस्व व पुरूषी जाचातून स्त्रीची मुक्ती झाली पाहिजे.
५. सर्वक्षेत्रातील स्त्रियांचे होणारे शोषण थांबले पाहिजे.
६. शिक्षण मिळाले पाहिजे.
७. अर्थोत्पादनाच्या प्रक्रियेत स्त्रीयांना स्थान पाहिजे त्याशिवाय सर्जनशीलता व स्वातंत्र्य गवसणार नाही.''[२]

महाराष्ट्रातील १९ व्या शतकातील स्त्रीवादी चवळवळीकडे नजर टाकली तर आपल्याला दिसते की अनेक महान समाज सुधारक आणि विचारवंत होवून गेले. त्यात ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, आनंदीबाई जोशी, लोकहितवादी, आगरकर, फुले, आंबेडकर अशी काही नांवे सांगता येतील. ताराबाई शिंदे यांनी प्रतिपादित केले की, जे गुण—दुर्गुण स्त्रियांचे असतात तेच गुण—दुर्गुण पुरूषांमध्येही असतात. हे दाखवून पितृसत्ताक विचारसरणीवर आघात केला. महाराष्ट्रात ताराबाई शिंदे या स्वतंत्र विचाराच्या स्त्रीने स्त्रियांना दुय्यम स्थान देणाऱ्या, स्त्री—शोषण करणाऱ्या परंपरा व रूढी यांना धक्का देण्याचा प्रयत्न केला आणि आपल्या विचारांमधून स्त्रीवादी तत्वज्ञानाचा पुरस्कार केला आणि त्यांचे हे विचार केवळ महाराष्ट्रातील स्त्रियांपुरते मर्यादित नसून भारतातील सर्व जातीतील, धर्मातील स्त्रियांचे हित संबंध जोपासणारे होते.

''आजची भारतीय स्त्री चळवळ' पाश्चात्य स्त्री प्रभावामुळे प्रभावित झालेली दिसत असली तरी तिचा उगम १९ व्या शतकात सुरू झालेल्या समाज सुधारणा चळवळीतूनच झालेला आहे. वारकरी संप्रदायापासून स्त्रिया आपल्या हक्कांविषयी जागरूक असल्याचे दिसून येते. जनाबाई, बहिणाबाई, मुक्ताबाई या स्त्रियांना आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरूद्‌ध विचार मांडलेले आहेत.''[३]''समाजामधील स्त्रीचे दुय्यम स्थान अधोरेखित करण्यासाठी भारतीय संस्कृतीमध्ये वापरलेली संकल्पना म्हणजे 'बीज क्षेत्र'. या संकल्पनेचा स्त्रीवादी अन्वयार्थ लावतांना, स्त्रियांचे दुय्यम स्थानांचे समर्थन करण्यासाठी पुरूषांच्या सुपिक डोक्यातुन निघालेली संकल्पना असा तिचा अन्वयार्थ लावला जातो. परंतु प्रत्यक्षात मात्र या संकल्पनेचा वापर स्त्री—पुरूषांनी आपल्या स्वार्थासाठी कसा केला याचा विचार इरावती कर्वे यांनी 'बीज क्षेत्र' या निबंधात केला आहे.''[४] ''महिलांनी राजकीयदृष्ट्या जागृत राहिले पाहिजे. त्याशिवाय त्यांच्या समस्या सोडविल्या जावू शकत नाही. मात्र आपल्याला असे निदर्शनास येते की, बहुतांश महिला या राजकीय दृष्ट्या उदासीन दिसतात. महिलांच्या राजकीय वागणूकीचे केलेल्या संशोधनातून पुढील निष्कर्ष आले. ते आले की, ''महिला कौटुंबिक जबाबदाऱ्या, पुरूषप्रधान संस्कृती, तिचा स्वत:कडे पाहण्याचा दृष्टीकोन, समाजाचा तिच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन, समाजाने तिची मान्य केलेली भूमिका, शिक्षण, तिला बाहेरच्या जगात वावरण्याची संधी या कारणांमुळे ती मतदानाच्या बाबतीत उदासीन असते.''[५]

''महिलांना राजकारणात स्थान मिळायला हवे. त्यांनाही सक्रिय भूमिका बजावता यावी. असे आज वाटत असले तरी स्वातंत्र्यपूर्व काळात समाज सुधारक ''रामास्वामी पेरियार यांनी स्त्री—पुरूष समानतेविषयी लिहितांना राजकारण व शिक्षण या क्षेत्रात महिलांना समान संधी मिळायला हवी, असे मत मांडले होते. त्यांच्या 'वुमन्स राईट' (वउमदश्े त्पहीज) या पुस्तकात तसे त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे. प्रसिद्‌ध समाजवादी विचारवंत राममनोहर लोहिया यांनी तर

प्रशासन व राजकारणात ६० टक्के राखीव जागा ठेवाव्यात, अशी मागणी केली होती.''[६]

''विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात नवसामाजिक चळवळींचा उदय झाला. स्त्री मुक्तीच्या दुसऱ्या लाटेमुळे (मबवदक ॅअम व थ्मउपदपेउ) स्त्रीवादाचे समग्र दर्शन सिद्ध झाले. नवा डावा विचार, उत्तर आधुनिक विचार, स्वातंत्र्योत्तर भारतातील फुले—आंबेडकरी विचार तसेच जॉन रॉल्स, अमर्त्य सेन, त्वदंसक कूवतापद यांसारख्या मत प्रणालींनी व अभ्यासकांनी न्याय, सत्ता व समता विषयक चर्चा विश्वात मोलाची भर घातली. सत्तेचे विविध पदर जसजसे स्पष्ट होत गेले तसतसे समतेचे विविध अर्थ आणि आशय ही स्पष्ट झाले.''[७]

''स्त्रीवादी चळवळी पुढील आव्हाने :—

१. या चळवळीने स्त्री समस्यांचे व प्रश्नांचे आकलन तोकडे राहिले. हे त्यांनी हाती घेतलेल्या प्रश्नावरून लक्षात येते. कारण कुटुंबांतर्गत अत्याचाराचे प्रश्न महत्वाचे मानले गेले. पुरूषप्रधान व्यवस्था आणि जातीव्यवस्था यांचा अन्योत्र संबंध या चळवळीने लक्षात घेतला नाही. त्यामुळे ब्राम्हणोत्तर स्त्रियांचे प्रश्न वेगळे आहेत हे त्यांच्या लक्षात आले नाही.
२. स्त्री चळवळीचे नेतृत्वही अर्थात या ठराविक स्त्रियांच्याच हाती असल्याने हे घटले. किंबहुना काही अपवाद वगळता या चळवळीत सहभागी असणाऱ्या स्त्रियांही उच्चवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय व शहरी होत्या.
३. जे प्रश्न हाती घेतले ते सोडविण्यासाठी ज्या मार्गावर चळवळीने भर दिला तेही या ठिकाणी लक्षात घ्यायला हवे. या विविध प्रश्नांकरिता कायदे करणे किंवा अस्तित्वात असलेल्या कायद्यांमध्ये सुधारणा घडवून आणणे हे चळवळीपुढचे समाजव्यवस्थेचा एक भाग आहे. हे चळवळीने लक्षात घेतले नाही.
४. परिवर्तनाचे सर्वात महत्वाचे माध्यम राजकारण आहे. हे स्त्री चळवळीने लक्षात घेतले नाही व ती सतत राजकारणातून फटकूनच राहिली.
५. स्त्रीवादी चळवळीत मतभेदांची दरी असते. ती दूर केली पाहिजे. उदा :— ३३ टक्के संसदेत व विधीमंडळातील आरक्षणाच्या मुद्यावर हा भेद दिसतो. राजकीय पक्षांशी संबंधित असलेल्या महिला संघटनांची भूमिका डाव्या पक्षांशी मिळती—जुळती आहे. तर काही महिला गट व स्त्रीवादी चळवळीतील कार्यकर्त्या राखीव जागांत इतर मागास वर्गीयांना कोटा देण्याची मागणी उचलून धरली आहे.''[८]

''स्त्रीवादी चळवळीने वरील आव्हानांचा तर्कशुद्ध पद्धतीने विचार करून उपाय स्विकारले पाहिजेत :—

१. ''स्त्रीवादी चळवळीतील विविध गटांमुळे मतभेद निर्माण होतात व ताणतणाव चळवळीत निर्माण होतो. तो दूर झाला पाहिजे. अस्पृश्यता आणि दडपशाहीच्या विरोधात दलित महिलांचे एक अधिवेशन व 'ऑल इंडिया डेमॉक्रॉटिक विमेन्स असोसिएशन' ने १९९८ मध्ये घेतले होते'' असे अधिवेशन घेवून विविध गटांमध्ये सामंजस्य निर्माण केले पाहिजेत्र''[९]
२. ''समाजातील सर्व कायदे, नियम स्त्री—पुरूषांनी परस्परांच्या संमतीने व सहकार्याने तयार केले पाहिजेत. त्याशिवाय स्त्रियांना समानतेची वागणूक मिळणार नाही व त्यांना न्याय मिळणार नाही. त्यामुळे स्त्रियांना दास्यात ठेवणाऱ्या धार्मिक, वैधानिक आणि राजकीय व्यवस्थांचे समूळ उच्चाटन केले पाहिजे.''[१०]
३. ''युनिफेम या संस्थेच्या संचालक नोइलीन हायझर यांच्या मते, स्त्रियांचे सामर्थ्य वाढविण्यासाठी चार गोष्टी महत्वाच्या आहेत. महिलांचे स्वयंमूल्यांकन, निवड करण्याची क्षमता, घरात आणि घराबाहेर स्वत:चे जीवन नियंत्रित करण्याची ताकद आणि सामाजिक परिवर्तनाला दिशा देण्याची व न्याय सामाजिक, आर्थिक व्यवस्था प्रस्थापित करण्याची तिची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील क्षमता या चार गोष्टी तिच्या अधिकार वाढविणाऱ्या आहेत.''[११]

४. स्त्री अत्याचाराचा प्रश्न हा केवळ कुटुंबांतर्गतच नाही तो तसा आहे. त्यावर घरगुती हिंसा प्रतिबंधक कायद्याचा प्रभावी वापर केला पाहिजे. तसेच इतर सामाजिक संस्था व संघटनांचा असलेला दबाव व जाचक रूढी, चालीरिती देखील झुगारला पाहिजे.
५. पुरूषप्रधान व्यवस्थेकडून स्त्री—पुरूष समताधिष्ठित व्यवस्था निर्माण केली पाहिजे.
६. जाती व्यवस्था, धर्म व्यवस्था यांची स्त्रीयांवर असलेल्या बंधनांना झुगारले पाहिजे.
७. स्त्री चळवळ ही समाजाच्या सर्वस्तरापर्यंत पोहचली पाहिजे. केवळ उच्च व उच्च मध्यम वर्गांपर्यंत मर्यादित न राहता मध्यम वर्ग व कनिष्ट वर्गांपर्यंत पोहचविली पाहिजे.
८. स्त्रियांच्या संरक्षणासाठी असलेल्या कायद्यांचा परिणामकारकपणे वापर झाला पाहिजे. त्यासाठी स्त्रियांमध्ये जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे.
९. स्त्रियांनी साक्षर झाले पाहिजे. जितके शिक्षण अधिक तितकी प्रगलब्धता अधिक तसेच जागृती अधिक राहील. शिक्षण हे एकमेव बदलाचे माध्यम आहे.
१०.स्त्रिया आर्थिकदृष्ट्या सबळ झाल्या पाहिजेत. जोपर्यंत आर्थिक परावलंबित्व कमी होत नाही तोपर्यंत अत्याचार कमी होणार नाही.
११.स्त्रियांनी राजकारणात येवून निर्णय निर्धारणाच्या प्रक्रियेत येवून सकारात्मक भूमिका बजावली पाहिजे.

संदर्भ :—

१. सुमंत यशवंत ‘‘स्त्रीवादाची ओळख’’, पुणे विद्यापीठ, डिसेंबर २०१२, पृ.४२
२. सुमंत यशवंत ‘‘स्त्रीवादाची ओळख’’, पुणे विद्यापीठ, डिसेंबर २०१२, पृ.२६, २७
३. भागवत विद्युत, रेगे शर्मिला, पलसाने वंदना, ‘‘स्त्री जीवनाची गुंतागुंत’’, विकास अध्ययन केंद्र, मुंबई, १९९४, पृ.२५
४. मोरे सदानंद (संपादक), परामर्श (स्त्री अभ्यास विशेषांक), तत्वज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रकाशन, मे २०१८, पृ.१२३
५. पवार दिपक, ‘‘महिलांचे राजकीय सक्षमीकरण‘‘, श्री.साईनाथ प्रकाशन, नागपूर, १६ मार्च २०१३, पृ.४७
६. निर्गुण नयना, ‘‘महिलांच्या इच्छाशक्तीची गरज‘‘, दैनिक सकाळ, नागपूर, रविवार सप्तरंग पुरवणी, दि.२३ ऑगस्ट २००५
७. सूमंत यशवंत, ‘‘महात्मा गांधीजींची विचारदृष्टी: काही अलक्षित पैलू’’, साधना प्रकाशन, पुणे, पृ. ३३
८. सोनाळकर वंदना, ‘‘ॲन अजेंडा फॉर जेंडर’’, पॉलिटिक्स, इ.पी.डब्ल्यू., खंड—३४, १ व २ जाने. १९९९
९. अखिल भारतीय जनवादी महिला संघटना पुस्तिका, ‘‘कन्व्हेंशन इन सपोर्ट ऑफ दलित विमेन्स राईट्स अगेन्स्ट अनटचॅबिलिटी ॲण्ड ऑप्रेशन’’, १९९८
१०.डॉ.कुंभार नागोराव, ‘‘महात्मा गांधीजींचे सामाजिक तत्वज्ञान’’, अरूणा प्रकाशन, लातुर, २०१२, पृ.८७
११.दंडवते प्रमिला, ‘‘धर्म आणि स्त्रियांचे अधिकार’’, साधना (साप्ताहिक), ९ मार्च १९९६, साधना प्रकाशन, पुणे
१२.दंडवते प्रमिला, ‘‘धर्म आणि स्त्रियांचे अधिकार‘‘, साधना (साप्ताहिक), ९ मार्च १९९६, साधना प्रकाशन, पुणे
१३.‘‘भारतीय संविधान‘‘, भारत सरकार व न्याय मंत्रालय, भारत सरकार प्रकाशित, सहावी आवृत्ती, २०१२
१४.श्रीवास्तव सुधरानी, श्रीवास्तव आशा, ‘‘महिला शोषण और मानवाधिकार‘‘, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, दिल्ली, २००६
१५.पाटील व्ही.बी., ‘‘मानवी हक्क‘‘, के.सागर प्रकाशन, २०१४
१६.राठी शुभांगी, ‘‘आधुनिक विचारप्रणाली‘‘, अथर्व प्रकाशन, धुळे, २०१४
१७.वाघमारे सी.एस., ‘‘मानव संसाधन विकास व मानवधिकार‘‘, पियर्सन प्रकाशन, दिल्ली, २०१३, पृ.२५१
१८.दैनिक दिव्यमराठी, २४/०१/२०१९